# अंत

जगणाऱ्याला कधी तरी मरण येणार
मेलेल्याला येथून जावे लागणार
मरण ना कुणासाठी थांबणार !

जगणाऱ्याला हे जग छळणार
सुखदुःखाला भोगावं लागणार
मरण ना कुणासाठी थांबणार !

जगताना हे जग नाडणार
मेलेल्यासाठी थोडा वेळ रडणार
मरण ना कुणासाठी थांबणार !

दिवस जाता, रडं थांबणार, हसू फुटणार
हसता हसता, पूर्वीचं विसरणार
मरण ना कुणासाठी थांबणार !

जन्म-मरणाचा खेळ चालूच रहाणार
हसण्या रडण्यात सारं आयुष्य जाणार
मरण ना कुणासाठी थांबणार !

जन्ममरण जाणण्यासाठी भविष्य पत्रिका पाहणार
मृत्यु टळत नाही म्हणून कुणाला सांगणार
मरण ना कुणासाठी थांबणार !

मृत्यु झाल्यावर इतरांना थोडं वाईट वाटणार
शोक करण्याशिवाय आपण काय करणार
मरण ना कुणासाठी थांबणार !

**– पद्माकर चित्रे**
**('शब्दांची फुलपाखरे' या कवितासंग्रहातून)**